अहमदनगर जिल्हयातील सामान्य रुग्णालय,उपजिल्हा रुग्णालये,ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आंरोग्य केंद्रे येथे कंत्राटी तत्वावर तदर्थ वैद्यकिय अधिकारी या पदावर भरती करणेबाबत.

जिल्हा रुग्णालय,उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर MBBS/BAMS अर्हताधारक कंत्राटी (तदर्थ) वैद्यकिय अधिकारी पदासाठी आवश्यकतेनुसार पदस्थापना देण्यात येणार आहे.

तरी इच्छुक MBBS/BAMS अर्हताधारक उमेदवारांनी मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर कार्यालाकडे फक्त E-Mail व्दारे दि.१५/०४/२०२० रोजी सायंकाळी ५.०० पर्यत अर्ज सादर करावेत.सदर अर्ज htc_nagar@rediffmail.com या E-mail ID वर सादर करावेत.

अर्जासोबत MBBS/BAMS अंतिम वर्षाचें गुणपत्रक व संबधित वैद्यकिय परिषदेकडील नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

पदस्थापना देण्यासाठी फक्त अंतिम वर्षाचे गुण ग्राहय धरले जातील व त्यासाठी कोणतेही समुपदेशन घेतले जाणार नाही.पदव्युत्तर पदवी/पदवीकाधारक व MBBS उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.इतर अटी व शर्ती सोबतच्या जोडपत्रानुसार राहतील.

| | |
|---|---|
| जिल्हा शल्य चिकित्सक<br>तथा<br>सदस्य सचिव<br>जिल्हा निवड समिती<br>अहमदनगर | जिल्हाधिकारी<br>तथा<br>अध्यक्ष<br>जिल्हा निवड समिती<br>अहमदनगर |

Scanned with CamScanner

## अटी व शर्ती -

१) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी हे शासकिय नियीमत कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यास पात्र असणार नाहीत.

२) कंत्राटी वैद्यकिय अधिकाऱ्यांचा सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पुर्व सुचना न देता समाप्त करण्यात येतील.

१)दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर

२)कामामध्ये निष्काळजीपणा

३)बायोमॅट्रिक प्रणालीवर हजेरी न लावणे

४)कामकाज अकार्यक्षम असणे/सेवेची कर्तव्ये व जबाबदाऱ्या कटाक्षाने न पाळल्यास

५)गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे

६)कार्यरत पदावर नियमित/बंधपत्रित वैद्यकिय अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यास

४) निवड झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी नियुक्तीच्या मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल.तसेच बायोमेट्रिक हजेरीप्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

५) निवड झालेले वैद्यकिय अधिकारी १ महिन्यापुर्वी आगाऊ सुचना जिल्हा शल्य चिकित्सक यांना देवून कार्यमुक्त होवू शकतील.

६) नियमित अथवा बंधपत्रीत वैद्यकिय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करताना जो वैद्यकिय अधिकारी त्या ठिकाणी शेवटी रुजू झालेला आहे त्याचर सेवा प्रथम समाप्त करण्यात येईल व इतर ठिकाणी नियुक्ती देणेबाबत प्राधान्य दिले जाईल.

७) वैद्यकिय अधिकाऱ्यांकडून त्याची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यांसाठी अंदोलन/संप/बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र १००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर घेण्यात यावे.

८) या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

९) शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

१०) प्रस्तुत अटी व शर्ती मध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार समितीकडे राखीव राहतील.

११) सदर नेमनुक ही तात्पुरत्या स्वरुपात असेल.

Scanned with CamScanner

१२) निवड झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांचे एकत्रित मानधन संदर्भ क्र.२ शासननिर्णय दि:१३/०६/१९ अन्वये खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्रं. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी गट -अ | एम.बी.बी.एस + पदव्युत्तर पदवी/ पदविका (विशेषज्ञ) | आदिवासी व दुर्गम भाग रु.७०,०००/- इतर भाग रु.६५,०००/- |
| २ | वैद्यकिय अधिकारी गट -अ | एम.बी.बी.एस | आदिवासी व दुर्गम भाग रु.६०,०००/- इतर भाग रु.५५,०००/- |
| ३ | वैद्यकिय अधिकारी | बी.ए.एम.एस | आदिवासी व दुर्गम भाग रु.४५,०००/- इतर भाग रु.४०,०००/- |

Scanned with CamScanner